# शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद पालघर

Email Id : edupalghar@gmail.com
samagrazppalghar@gmail.com

****************************************************************************

जाक्र/पाजिप/शिक्षण/प्राथ./आस्था/वशी- /२०२५/६२२ दिनांक- २७/०५/२०२५

---

**प्रसिद्धीपत्रक**

**विषय:- जिल्हा परिषद पालघर अंतर्गत कार्यरत विकल्प विपरीत शिक्षक व आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांच्या नकाराबाबत.**

उपरोक्त विषयान्वये जिल्हा परिषद पालघरकडे २७४ विकल्प विपरीत शिक्षक व आंतरजिल्हा बदली झालेले सर्व शिक्षकांना कळविण्यात येते कि, खालील नमूद मुद्यानुसार आवश्यक कागदपत्रांसह नकारपत्र सादर करावीत.

**नकार देण्यास पात्र असलेले शिक्षक-**

१. विकल्प विपरीत २७४ शिक्षकांपैकी जिल्हा परिषद ठाणे येथे जाण्यास नकार असलेले शिक्षक.

२. विकल्प विपरीत २७४ शिक्षकांपैकी ज्या शिक्षकांची आंतरजिल्हा बदली झाली आहे, अशा शिक्षकांचा आंतरजिल्हा बदलीस किंवा विकल्पानुसार जिल्हा परिषद ठाणेकडे जाण्यास नकार असलेले शिक्षक. (**विकल्प विपरीत असून आंतरजिल्हा बदली जि. प. ठाणे येथे झालेले शिक्षकांनी त्यांना आंतरजिल्हा बदली नुसार किंवा विकल्प विपरीत नुसार कार्यमुक्त करावे याबाबत स्पष्ट अभिप्राय कार्यालयास कळवावे.**)

३. आंतरजिल्हा बदलीने पालघर जिल्हा परिषदेमधून अन्य जिल्हा परिषदेमध्ये सन २०१७ ते २०२३ या कालावधीत झालेल्या बदलीच्या अनुषंगाने कार्यमुक्त करण्यास नकार असलेले शिक्षक.

विकल्प विपरीत २७४ शिक्षकांपैकी किंवा सन २०१७ ते २०२३ या कालावधीत आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांपैकी ज्या शिक्षकांनी यापूर्वी नकार कळविले असतील अशा शिक्षकांनी देखील पुन:श्च एकदा नकारपत्र सादर करावयाचे आहेत.

- **सोबत:-** विहित प्रपत्र

* स्थळप्रतीवर मा. मु. का. अ. यांचे स्वाक्षरी असे.

(सोनाली मातेकर)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद पालघर

**२/- गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती....... सर्व**

आपल्या तालुका अंतर्गत कार्यरत असलेले २७४ विकल्प विपरीत शिक्षक व सन २०१७ ते २०२३ या कालावधीत आंतरजिल्हा बदली झालेले शिक्षक यांचेकडून वर नमूद १ ते ३ च्या मुद्यानुसार आवश्यक कागदपत्रांसह नकारपत्र घेऊन तालुक्यातील एकत्रित नकारपत्राची माहिती सोबत दिलेल्या विहित नमुन्यामध्ये दि.३०/०५/२०२५ पर्यंत या कार्यालयास सादर करण्यात यावी. माहिती मुदतीत प्राप्त न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील, त्यामुळे सदरचे पत्र खालील अनु क्र. १ ते ३ नुसार पात्र असलेल्या शिक्षकांना अवगत करून माहिती वेळेत सादर करण्याची दक्षता घ्यावी.

(सोनाली मातेकर)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद पालघर

Scanned with CamScanner

शिक्षण विभाग प्राथमिक, जिल्हा परिषद पालघर

विकल्प विपरीत २७४ शिक्षक व सन २०१७ ते २०२३ या कालावधीत आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांची माहिती.

| अ.क्र. | शिक्षकाचे नाव | सद्यस्थितीमध्ये कार्यरत जि. प. शाळा | तालुका | मुळ प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | आंतरजिल्हा बदली / विकल्प विपरीत (जे लागू असेल ते नमूद करावे.) | आंतरजिल्हा बदली झाली असल्यास बदली वर्ष | आंतरजिल्हा बदली झालेल्या जिल्हा परिषदेचे नाव | विकल्प विपरीतनुसार जिल्हा परिषद ठाणे येथे जाण्यास नकार आहे/नाही | विकल्प विपरीत शिक्षकांपैकी ज्या शिक्षकाची आंतरजिल्हा बदली झालेली आहे अशा शिक्षकाचा विकल्प (विकल्प विपरीत / आंतरजिल्हा बदली ) | आंतरजिल्हा बदलीने जाण्यास नकार आहे/नाही | सद्यस्थितीत विकल्प विपरीत व आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांपैकी सेवानिवृत्त/ स्वेच्छानिवृत्त/ मयत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | |

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, पालघर

Scanned with CamScanner